www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 162 वार बुधवार दि. 26 फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा दर्जा




**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 12 किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळविण्यासाठी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री अड.आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ आज पॅरिसला गेले आहे. महाराष्ट्र शासनाने 'मराठा लष्करी भूप्रदेश' (Maratha Military Landscape of India) या संकल्पनेअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. या किल्ल्यांमध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूतील जिंजी किल्ला यांचा समावेश आहे. याबाबतचे सादरीकरण पूर्ण क्षमतेने प्रभावीपणे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हे शिष्टमंडळ गेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड किल्ल्यांचा **पान २ वर**

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक सुनावणी पुढे ढकलली

## 4 मार्चला सुनावणी घेण्याची मागणी, चार वर्षांपासून रखडल्या निवडणुका

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबत सुप्रीम कोर्टातील सुनावणी कालही होऊ शकली नाही. काल हे प्रकरण 29 व्या क्रमांकावर होते, पण कोर्ट क्रमांक 3 मध्ये काल दुपारी एक वाजेपर्यंतच कामकाज होणार होते. 8 व्या क्रमांकापर्यंतची प्रकरणे कोर्टाने ऐकली. त्यानंतर कामकाज संपताना याचिकाकर्त्यांचे वकील आणि सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी 4 मार्च ही तारीख मागितली. कोर्टाने त्यावर विचार करू असे म्हटले. आता पावसाळ्याआधी एप्रिल आणि मे महिन्याची डेडलाईन जवळ येत असताना 4 मार्चला तरी काही ठोस होते का? यावर निवडणुकांचे भवितव्य अवलंबून आहे. विधानसभा निवडणुकीनंतर सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. तशी मोर्चेबांधणी विविध पक्षांकडून सुरु झाली आहे. मात्र मात्र प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे त्यांना आणखी वाट पाहावी लागणार आहे. 25 जानेवारी 2025 रोजी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी सुनावणी झाली होती. मात्र त्यावेळीही सुनावणी पुढे ढकलत 25 फेब्रुवारी तारीख देण्यात आली. त्यानंतर कालही सुप्रीम कोर्टात यावर सुनावणी झाली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. या याचिकेच्या माध्यमातून निवडणुका घेण्यासंदर्भात विनंती न्यायालयाकडे करण्यात आली. तर ओबीसी आरक्षण असो किंवा नसो मात्र निवडणुका व्हाव्यात, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी मागणी केली आहे.

### अनेक ठिकाणी चार वर्षांपासून रखडल्या निवडणुका

या प्रकरणात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा प्रलंबित आहे. त्यामुळे राज्यातील महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे भवितव्य अधांतरी आहे. निवडणुकीच्या वेळापत्रकावर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यामध्ये ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चार- चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभा निवडणूक पार पडली. त्यापाठोपाठ राज्यातही विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे.

# मुबंई जुहू येथे वार्षिक स्पोर्ट डे साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे**
**सह संपादक**

जुहू इरला एज्युकेशन सोसायटी अब्दुल माजीद खातीब ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स फातिमा ए.के. नाडीयवाला स्कूल एच एम इशाक प्रा तरयमरी स्कूल यांचे वार्षिक स्पोर्ट दिवस 2024-25 साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी श्री अजित महामुनकर सर दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष उपस्थित होते. अजित महामुनकर हस्ते रिबीन कापण्यात आली व स्पर्धेला सुरुवात झाली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पूर्व भारतीय टेस्ट क्रिकेटर गुलाम पारकर तसेच कोकण बँकेचे चेअरमन उपस्थित होते. तसेच अध्यक्ष इम्तियाज दवे प्रिन्सिपल मॅडम शायदा शेख विकास किरटकडवे शहनाज खान नफीज खालफा हे मान्यवर उपस्थित होते. अजित महामुनकर सर आणि गुलाम पारकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मेडल आणि ट्रॉफी देण्यात आली. स्पोर्ट च्या नंतर सहभोजन करून स्पोर्ट डे 2024 25 साजरा करण्यात आला आणि अजित महामुनकर सर यांनी गुलाम पारकर सरांचे आभार मानले.




# महाशिवरात्री सोहळ्यात आज अमित शहा सहभागी होणार

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

**कोईम्बतूर :** महाराशिवरात्रीनिमित्त येथील इशा योगा सेंटर येथे आदियोगी आणि सद्गुरूंच्या सहवासात होणाऱ्या सोहळ्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार हे सहभागी होणार आहेत. आज २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजल्यापासून या कार्यक्रमास सुरुवात होणार असून २७ रोजी सकाळी सहा वाजता याची सांगता होणार आहे. रात्रभर 'ओम नमः शिवाय' या महामंत्राचा जागर केला जाणार आहे. या मंत्राच्या उच्चाराने परिसर शिवमय होणार आहे. सलग बारा तास चालणाऱ्या या उत्सवात पहाटे ३.४० वाजता ब्रह्ममुहूर्तावर सद्गुरूंचे बहुमोल मार्गदर्शन लाभणार आहे. आध्यात्मिकदृष्ट्या हा मुहूर्त अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. दरम्यान याच वेळी सद्गुरूंच्या हस्ते एका मिरॅकल ऑफ दी माईड या मेडिटेशन ॲपचे उद्घाटन करण्यात येणार आहे. ज्यांना दररोज सात मिनिटे चिंतन करायचे आहे, त्यांच्यासाठी हे ॲप बनविण्यात आले आहे. दरम्यान, रात्रभर भक्तगणांना खिळवून ठेवण्यासाठी ख्यातनाम संगीतकार अजय-अतुल, मुक्तीदान गढवी, कॅसमे, साऊंडस ऑल इशा, इशा संस्कृती असे विविध कार्यक्रमांची मेजवानी राहणार आहे. या कार्यक्रमामध्ये विविध राज्यातील आमदार, मंत्री तसेच गायक, अभिनेते सहभागी होणार आहेत.

















## संपादकीय

# महाशिवरात्री

**विषय:- सृष्टीचे पालनहार "देवादी देव महादेव"**

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व हिंदू धर्माचे तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे.परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच "शिव-पार्वती" आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार -पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदु मान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते.भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे. त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते. त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे.आज स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते. आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या हृदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे.आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे.त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे.त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे ॐ नमः शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते,शांती मिळते, आरोग्याच्या दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना "हर हर महादेव"चा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा "हर हर महादेव "चा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विग्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन महाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती उष्णता,अती थंडी,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे.अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय,भुकंप,अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानच्या सान्निध्यातील काणा -कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल.त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल.हर हर महादेव!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा दर्जा

**पान १ वरुन** राज्य शासनाचा प्रस्ताव प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युनेस्कोकडे पाठवला, त्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे व सादरीकरणासाठी जाण्याची संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही मंत्री अड.शेलार यांनी आभार मानले आहेत. या प्रस्तावाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यांचे शिष्टमंडळ २२ ते २६ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत पॅरिस, फ्रान्स येथे गेले आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री अड.शेलार करणार आहेत. इतर सदस्यांमध्ये अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी आणि वास्तुविशारद शिखा जैन यांचा समावेश आहे. या शिष्टमंडळाच्या पॅरिस दौऱ्याद्वारे, या किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा मिळविण्यासाठी आवश्यक तांत्रिक आणि राजनैतिक सादरीकरण करण्यात येईल. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांना जागतिक स्तरावर ओळख मिळण्यास मदत होईल. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाल्यास, या किल्ल्यांचे जतन, संवर्धन आणि पर्यटन विकासासाठी अधिक संधी उपलब्ध होतील. ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारशाचे महत्व आणि जतन सुनिश्चित होईल, अशी आशा अड.आशिष शेलार यांनी व्यक्त केली आहे.

# राज्यपालांकडून परळ येथील शाळेतील स्मार्ट वर्गखोली व स्वच्छता सुविधांची पाहणी

## स्मार्ट क्लासरूम सोबत स्मार्ट शिक्षक असणे आवश्यक : सी पी राधाकृष्णन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

सामाजिक दायित्व निधीतून समाजकार्य अनिवार्य केल्यापासून गेल्या दशकामध्ये शिक्षण, आरोग्य, पर्यावरण यांसह अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य झाले असून या निधीतून होत असलेले शासकीय व निमशासकीय शाळांच्या आधुनिकीकरणाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले. राज्यपाल राधाकृष्णन यांनी दि. २१ परळ मुंबई येथील श्री तुलसी हिंदी माध्यमिक विद्यालयास भेट देऊन तेथे सामाजिक दायित्व निधीतून तयार करण्यात आलेल्या स्मार्ट वर्गखोल्यांची तसेच स्वच्छतागृहांची पाहणी केली, त्यानंतर ते बोलत होते,स्मार्ट क्लासरूम व डिजिटल बोर्ड उपलब्ध करून देताना स्मार्ट शिक्षक असणे आवश्यक





आहे असे सांगून शिक्षक परिवर्तनासाठी तयार नसल्यास आधुनिक सुविधांचा लाभ अपेक्षित प्रमाणात पोहोचणार नाही असे राज्यपालांनी सांगितले युवा अनस्टॉपेबल' या अशासकीय संस्थेच्या पुढाकाराने शाळांच्या अद्ययावतीकरणाची देशव्यापी मोहीम राबविण्यात आली असून त्या योजनेअंतर्गत शाळेला स्मार्ट क्लासरूम व आधुनिक स्वच्छतागृहे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत पंतप्रधानांच्या मार्गदर्शनाखाली देशात अनेक परिवर्तनकारी उपक्रम राबविण्यात येत असून 'स्वच्छ भारत' उपक्रमाअंतर्गत रेल्वेमध्ये बायो टॉयलेट बसविल्यामुळे देशातील रेल्वे स्थानके स्वच्छ झाली असल्याचे त्यांनी सांगितले शाळांमध्ये आधुनिक स्वच्छतागृहे बसवून देताना तेथे पुरेसे पाणी उपलब्ध असल्याची खातरजमा करावी अशी सूचना राज्यपालांनी यावेळी संस्थांना केली. यावेळी राज्यपालांनी मुलांना परस्पर संवादी माध्यमातून शिक्षण देण्यासाठी तयार केलेल्या विज्ञान - तंत्रज्ञान प्रयोगशाळेला भेट दिली तसेच शाळेत नव्याने विकसित करण्यात आलेल्या स्वच्छता सुविधा आणि स्मार्ट वर्गखोल्यांची पाहणीकेली, या प्रसंगी युवा अनस्टॉपेबलचे संस्थापक अमिताभ शहा, एचडीएफसी बँक 'परिवर्तन' उपक्रमाच्या प्रमुख नुसरत पठाण, लेखक अमीश त्रिपाठी, पार्थ वसवडा (युवा अनस्टॉपेबल), कॉर्पोरेट क्षेत्रातील नेते आणि युवा अनस्टॉपेबलच्या माध्यमातून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते. राज्यपालांच्या हस्ते टाटा कॅपिटल, बँक ऑफ अमेरिका, जीएसके, नोमुरा, कॅपजेमिनी, नुवामा, एचडीएफसी बँक, बजाज इलेक्ट्रिकल्स, येस बँक, फिनोलेक्स आणि इतर संस्थांच्या प्रतिनिधींना त्यांच्या योगदानाबद्दल 'युवा कृतज्ञता पुरस्कार' प्रदान करण्यात आले.

## सिंगोना येथील जि.प.शाळेत विद्यार्थीनीना गणवेशचे वाटप .

### शाळेच्या सर्वांगीन विलकासासाठी पालकांचा सहभाग महत्वाचा......कैलास सोळंके

**दैनिक युवक आधार**
**परतूर - जालना(अशोक ठोके)**

परतूर तालुकयातील सिंगोना जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थीनीना गणवेश वाटप करणयात आले.या वेळी कैलास सोळके, बाबुराव गरड, अंकुश लांडगे, मुख्याध्यापक कांकड़े यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमात आपल्या मनोगतात कैलास



सोळंके यांनी जिल्हा परिषद शाळेच्या वाढत्या सैक्षणिक आलेखाचे कौतुक करत शाळेच्या सर्वांगीन विकासासाठी पालकानी पण सतत समन्वयं साधत पुढाकार घेणे महत्वाचे असल्याच्या भावाना व्यक्त केल्या. गणवेश वाटपाबाबत शाळेच्या मुख्याध्यापकाने विशेष पाठपुरावा केला होता.या सह अनेक स्पर्धा परीक्षेत सिंगोना शाळेने प्रत्येक वेळी चांगले प्रदर्शन करत यश प्राप्त केल्याचाही उल्लेख सोळंके यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. सदरील कार्यक्रमाला सावंत सर,लहाने सर, श्रीमती कुलकर्णी मॅडम व विधार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**दैनिक युवक आधार - गोंदिया जिल्हातील भानपुर मध्ये प्राचीन काळाच्या शिव मंदिर आहे महाशिवरात्री निमित्त. दरवर्षेप्रमाणे यात्रा चे आयोजन करण्यात आले आहे. ह्यावेळी मंदिराच्या परिसराची सर्व गावकरी मिळून साफसफाई केली. व ह्यावर्षी 30 ते 50 हजार भाविक दर्शनाला येतील असे गावच्या लोकांनी माहिती दिली.**

**(छायाचित्र प्रतिनिधी सचिन बनसोड )**

## निर्लज्ज नगर परिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली...

### छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावरील तुटलेल्या जिमच्या साहित्याची स्वखर्चाने केली दुरुस्ती :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** बीड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणांवर सकाळी आणि सायंकाळी व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना नगर परिषद प्रशासनाने बसवलेले साहित्य मोडकळीस आले होते. या मुळे व्यायाम करणारांची हेळसांड होत होती. मोडकळीस आलेल्या जिमच्या साहित्याची दुरुस्ती करण्यात यावी या साठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासकीय ध्वजारोहणा साठी आलेले क्रिडा मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले होते. निवेदन अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नरेंद्र कुलकर्णी यांनी मुख्याधिकारी नगर परीषद बीड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत लेखी कळवले होते. मात्र नेहमी प्रमाणेच नगर परिषद प्रशासनाने या कडे दुर्लक्ष केले. व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांची हेळसांड लक्षात घेऊन "गुड मॉर्निंग " ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेत आणि स्वखर्चाने सगळ्या साहित्यांची दुरुस्ती करून घेतली. त्या मुळे एकंदरीतच निर्लज्ज नगर परिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. गुड मॉर्निंग ग्रुपच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या बाबत सविस्तर माहितीस्तव अशी की बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सकाळी आणि सायंकाळी नागरीकांची गर्दी असते. व्यायामाच्या दृष्टीने अनेक नागरिक या ठिकाणी येतात. अशा



नागरीकांसाठी व्यायाम करण्यासाठी काही वर्षापुर्वी ओपन जिमचे साहित्य बसविण्यात आले होते. या साहित्याची कित्येक महिन्यांपासून मोडतोड झालेली होती. अनेक साहित्य मोडकळीस आलेले होते. त्या मुळे व्यायामासाठी आलेल्या नागरीकांची हेळसांड होत होती. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या सहकाऱ्यांनी नगर परिषद प्रशासनाला वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे मोडकळीस आलेल्या साहित्याची दुरूस्ती करण्याची मागणी केली होती. मात्र नगर परिषद प्रशासनाने या कडे दुर्लक्ष केले होते. गुड गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी ही बाब लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने तुटलेल्या जिमच्या साहित्याची वेल्डिंगने दुरुस्ती केली. या साठी अँड.चंदुभाऊ जटाळ, जयदत्त थोटे, शरद जवळकर, अँड.शिवाजी साळवे, राजुशेठ गोरे, घोगरे, संतोष पवार, दिनेश गुरखुदे, जितेंद्र कासट, आनंद बाहेती, किशोर कागदे, अलीम भाई, सुर्यवंशी, ढाकणे, अंकुश निर्मळ, अशोक सुरवसे, वानखेडे, मुकेश भस्मारे, कोठारी, मिसाळ, बाळु निकम, असत पटेल, राजु दळवी यांनी मोलाचे योगदान दिले.

## ट्रकमध्येच संसार; आर्थिक संकटाशी झुंज देत कुटुंबाचा संघर्ष

**दैनिक युवक आधार**
**बुलढाणा वार्ताहर** – सिंदखेड राजा तालुक्यातील जनुना गावातील एकनाथ तुकाराम पवार आणि त्यांची पत्नी ललिता पवार गेल्या दहा वर्षांपासून ट्रकमध्येच संसार करत आहेत. सततच्या आर्थिक अडचणींमुळे त्यांना रस्त्यावर राहण्याची वेळ आली असून, त्यांची तीन मुलींपैकी दोन लहान मुली त्यांच्यासोबत ट्रकमध्येच राहतात, तर मोठी मुलगी गावात राहून शिक्षण घेत आहे. २०२३ मध्ये कर्ज काढून त्यांनी महिंद्रा कंपनीचा ट्रक विकत घेतला. मात्र, वारंवार होणाऱ्या बिघाडांमुळे उत्पन्नावर परिणाम होत आहे. महिन्याला ६८,५०० रुपये कर्जहप्ता भरणे कठीण झाले असून, खर्च भागवण्यासाठी संपूर्ण कुटुंब ट्रकमध्येच राहत आहे. ललिता पवार पतीला ट्रक चालवण्यात मदत करत असून, मुलींच्या शिक्षणाची जबाबदारीही त्या पार पाडत आहेत. एकनाथ पवार यांनी सांगितले की, वाढत्या आर्थिक तणावामुळे अनेकदा आत्महत्येचे विचार मनात येतात. मात्र, कुटुंबाच्या जबाबदारीमुळे ते हा संघर्ष सुरू ठेवत आहेत. सततच्या प्रवासामुळे मुलींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होत असून, सरकार आणि समाजाने मदतीसाठी पुढे यावे, अशी त्यांची विनंती आहे.




# अतिक्रमण पीडित व्यापाऱ्यांचे पुनर्वसन होईपर्यंत वित्तीय संस्थाकडून करण्यात येणारी कर्जवसुली थांबवावी :- संभाजी माळवदे

## जिल्हाधिकारी यांना भेटून निवेदनाद्वारे केली मागणी

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी**
**लखन वाल्हेकर**

अतिक्रमण पीडित व्यापाऱ्यांचे पुनर्वसन होईपर्यंत वित्तीय संस्थाकडून करण्यात येणारी कर्जवसुली वर्षभरासाठी थांबवावावी अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी केली. सविस्तर वृत्त असे की, शासनाकडून संपूर्ण राज्यभर शासकीय जागेवरील अतिक्रमण हटविण्याची तातडीची मोहीम राबविण्यात आली आहे. तातडीच्या नोटीसा व तातडीची कारवाई यामुळे अनेक व्यापाऱ्याचे व्यवसाय उध्वस्त होऊन 'होत्या चे नव्हते'

> सत्ता मिळाल्यावर लगेच कारवाईला सुरुवात हेच व्यापाऱ्यांचे अच्छे दिन आहे काय? ज्यांनी सत्ता दिली त्यांना उध्वस्त करून जीवन मरणाच्या दारात आणून ठेवणाऱ्या महायुतीचा राज्यभर व्यापाऱ्यांनी निषेध करायला हवा.ज्या बहिणीच्या जीवावर सत्ता मिळवली त्यांना एकविशे रुपये सोडा त्यांची छाननी करून त्यांच्याशी नाते तोडले आहे. या सर्व घटनाची जाणीव ठेवून येथून पुढल्या काळात या सरकारला धडा जनतेने शिकवावा. –
> **संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी**

झाले. या व्यापाऱ्यांमध्ये मोठ्या गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. अशातच वित्तीय संस्थादेखील आपण दिलेले कर्ज आता बुडते की काय या भीतीने दिलेले कर्ज वसुलीसाठी पुढे सरसावल्या आहे. यात राष्ट्रीयकृत बँका, मल्टीस्टेट, पतसंस्था, विविध फायनान्स कंपनी, यांचा समावेश असून या संस्थानी अतिक्रमण पीडित व्यापाऱ्यांना कर्ज हप्त्याचा जोराचा तगादा सुरु केला आहे. यामुळे व्यापारी हैराण झाले आहे. अतिक्रमण हटविल्याने व्यवसाय उध्वस्त झालेल्या व्यापाऱ्यांपुढे कर्ज हप्ता भरण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे. अनेक व्यापाऱ्यांनी तर यातून मुक्तीसाठी आत्महत्या हा मार्ग पत्करला आहे. व्यापाऱ्यांच्या या समस्याची गंभीर दखल घेत आज प्रदेश काँग्रेसचे कामगार विभागाचे अध्यक्ष संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांची भेट घेत ज्या व्यापाऱ्यांचे अतिक्रमणमध्ये दुकानें काढण्यात आली आहे. त्या व्यापाऱ्यांचा व्यवसाय स्थिर होईपर्यंत साधारण एक वर्षाच्या कालावधीसाठी वित्तीय संस्थाकडून यांना कर्जाचे हप्ते भरण्यासाठी सवलत द्यावी. कुठल्याही प्रकारचा त्रास या व्यापाऱ्यांना देऊ नये, तसा आदेश वित्तीय संस्थांना द्यावा अशी मागणी केली. याशिवाय सदर प्रश्न हा राज्यभराचा असल्यामुळे व धोरणात्मक असल्यामुळे या प्रश्नाबाबत राज्याचे मुख्यमंत्री, अर्थमंत्री यांच्याशी संवाद साधून राज्यभरासाठी हा निर्णय लागू करावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांना भेटून लेखी निवेदणाद्वारे करण्यात आली. यावेळी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिद्धिराम सालीमठ यांनी अतिक्रमण पीडित व्यापाऱ्यांच्या या प्रश्नाबाबत त्वरित लीड बँकाशी चर्चा करून निर्णय घेऊन व्यापाऱ्यांना दिलासा देऊ असे स्पष्ट करत राज्य सरकारला सुद्धा याबाबत कळविण्यात येईल असे स्पष्ट केले. निवेदनावेळी नेवासा काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल,बसपाचे हरीश चक्रनारायण आदीसह काँग्रेसचे कार्यकर्ते व व्यापारी उपस्थित होते.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

## पत्रकार म्हणजे समाजातील तिसरा डोळा :- गितांजली ढोणे

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालूका शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या वतीने बेलवाडी परिसरातील आदर्श पत्रकार व गुणगौरव विध्यार्थी यांचा सत्कार समारंभ आनंदात पार पडला यावेळी जिल्हा महिला संपर्कप्रमुख यांनी बेलवाडी गावात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आदर्श पत्रकारिता व गुणवान विध्यार्थी यांचा सत्कार प्रसंगी कार्यक्रमात बोलताना समाजातील तिसरा डोळा म्हणून पत्रकार बांधव यांच्याकडे बघितलं जात असल्याचे प्रतिपादन केले. इंदापूर तालूका एकनाथ शिंदे गटाचे तालुका प्रमुख रामचंद्र जामदार यांच्या संकल्पनेतून हा गुणगौरव पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी तालुक्यातील सिटी प्लस मराठीचे संपादक गणेश मोरे,दैनिक युवक आधारचे पत्रकार विकास क्षत्रिय,दैनिक रोखठोकचे पत्रकार अनिल कदम,दैनिक पुढारीचे रियाज सय्यद,दैनिक लोकमतचे पोपट मुळीक यांचा सत्कार पुणे जिल्हा महिला संपर्क प्रमुख गीतांजली ढोणे,पुणे जिल्हा आरोग्यदूत प्रमुख विद्या गायकवाड,सह.संपर्क प्रमुख कटके ताई, इंदापूर तालूका प्रमुख रामचंद्र जामदार, उपतालुका प्रमुख लोंढेताई,तालुका समन्वयक विजय पवार यांच्याहस्ते इंदापूर तालुक्यातील पत्रकार व बेलवाडी गावातील विध्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात बेलवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते प्रकाश खैरे पाटील,अनिल कदम मुख्याध्यापक भोसले सर यांनी मनोगत व्यक्त करून बेलवाडी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी विकासनिधी देण्याची मागणी करण्यात आली.यावेळी ग्रामस्थ व विध्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.





**दैनिक युवक आधार -** पत्रकार अँड.महेश बेदरे यांची बीड जिल्हा पत्रकार संघाच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच मौलाना आझाद राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्या बद्दल लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देताना. चेअरमन राजेंद्रजी गोरे सर व सर्व शिक्षक सहकारी, कर्मचारी वर्ग

**(छाया - राहुल सोनवणे, प्रेस फोटोग्राफर पाटोदा)**

## सोमवार पेठेतील छत्रपती शाहू महाराज उद्यानाचा 75 व्या वर्धापन दिन संपन्न,

**दैनिक युवक आधार**
**पुणे वार्ताहर**

सोमवार पेठेतील के ई एम हॉस्पिटल समोरील पुणे महापालिकेचा छत्रपती शाहू महाराज उद्यानाला 75 वर्षे पूर्ण झाल्याने त्याचा वर्धापन दिन शाहू उद्यान ज्येष्ठ नागरिक ग्रुपच्या वतीने साजरा करण्यात आला,

यावेळी छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले होते,

याप्रसंगी उपस्थित नागरिकांना अल्पोपहार देण्यात आला होता यावेळी राजू अरोरा, दिलीप बहिरट, बंडू गुजर, रामानंद शेट्टी, सतीश निजामपूरकर, जयवंती राजपूत, निता पवार, मनीषा शिंदे, आदि यावेळी उपस्थित होते




# नवी मुंबई सनदी लेखापाल विद्यार्थी संघटनेच्या कोषाध्यक्षपदी अथर्व घोडकेयांची कोषाध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

नवी मुंबई सनदी लेखापाल विद्यार्थी संघटनेच्या कोषाध्यक्षपदी "कु. अथर्व संजीवनी संदीप घोडके" याची एकमताने नुकतीच निवड झाली आहे. यांच्या निवडीने युवावर्गात आनंदाचे वातावरण असून त्याच्यावर सर्वस्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. नवी मुंबई सनदी लेखापाल विद्यार्थी संघटनेच्या मध्ये कु.अथर्वघोडके कतृत्वाने, नेतृत्वाने आणि पुढाकाराने व चिकाटीने केलेल्या कामामुळे नवी मुंबई सनदी लेखापाल विद्यार्थी संघटनेच्या विकासात्मक कार्यात विशेष फरक पडला आहे. त्याच्या आर्थिक व्यवस्थापन कार्यक्षमते मुळे संघटनेला सक्रिय पावले उचलण्याची आणि ध्येयांना पाठिंबा देण्याची अथर्वची क्षमता कौतुकास्पद असल्याचे सदर सत्कार प्रसंगी मान्यवर पदाधिकाऱ्यांनी सांगितले, आपल्या यशा बाबत आमच्या प्रतिनिधी बरोबर बोलताना कु.अथर्व म्हणाला माझ्या यशात माझी आई सौ. संजीवनी घोडके रयत शिक्षण संस्थेत गणित विषयाची शिक्षिका असून माझे बाबा डॉ. संदीप घोडके जेआज रयत शिक्षण संस्थेतील राज्यशास्त्र वि. प्रमुख,संशोधक व पीएचडी. मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत आणि त्याच बरोबरीने मला याविषयात मार्गदर्शन करणारे माझे शिक्षक यांचा सिहांचा वाटा आहे म्हणूनच मी आज या पदावर कार्यरत आहे.असे तो म्हणाला. "कु. अथर्व संजीवनी संदीप घोडके हा कुशाग्र बुद्धीचे वरदान लाभलेला विद्यार्थी असूनयापूर्वी त्याने दहावी बारावी बोर्डाच्या परीक्षेत अनुक्रमे 93 व 94 टक्के गुण मिळवले.आहेत तर सनदी लेखापाल प्रवेश परीक्षेत सुद्धा त्याने पहिल्या प्रयत्नात यश संपादन केले आहे, मुंबईतील पोतदार महाविद्यालयातून नुकतीच त्याने उच्च गुणांसह पदवी संपादन केली आहे. सध्या तो नवी मुंबई व मुंबईतील नामांकित लेखापाल फर्ममध्ये प्रशिक्षण घेत आहे.




# तळोजा मजकूर येथील पुरातन शिवमंदिराचा जिर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा कलशारोहण सोहळा भक्तीभावाने संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल,वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील तळोजा मजकूर येथील शिवमंदिराचा जिर्णोद्धार तसेच प्राणप्रतिष्ठा कलशारोहण सोहळा मोठ्या भक्तीभावाने व विविध धार्मिक कार्यक्रम करून साजरा करण्यात येत आहे. अति प्राचीन सिद्धेश्वर मंदिर जिर्णोद्धार, प्राणप्रतिष्ठा व कलश रोहण सोहळा श्री सिद्धेश्वर मंदिर तळोजा मजकूर येथे तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम राबवून संपन्न होत आहे. यावेळी प्रामुख्याने मुख्य मान्यवर म्हणून योगीराज यशवंत महाराज, बबनदादा पाटील, ह.भ.प.रामदास बुवा, रायगड जिल्हा वारकरी अध्यक्ष ह.भ.प.धनाजी बुवा, कामगार नेते महेंद्रशेठ घरत, जगदीश गायकवाड, रामदास पाटील, बबन केणी, कनिल यांच्यासह मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ, शाळकरी विद्यार्थी सहभागी झाले होते. यानिमित्ताने पहाटेच्या वेळी काकड आरती, हरिपाठ, महाआरती, कलश शोभा यात्रा, मुर्ती मिरवणूक, मुर्तिप्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा, क्षेत्र पाल पुजन पुर्णाहूती, तसेच विविध भजन मंडळाची भजने, किर्तने आदींचे आयोजन सलग तीन दिवस करण्यात येत असून या निमित्ताने हजारो भाविक या सोहळ्यात सहभागी झाले होते. या सर्वांचे स्वागत निमंत्रक व ग्रामस्थ मंडळ तळोजा मजकूर यांच्या वतीने बबनदादा पाटील यांनी केले. या धार्मिक कार्यक्रमावेळी बबनदादा पाटील यांना बाळासाहेब पंचकृषी पुरस्कार व सद्गुरु वामन बाबा पुरस्कार तळोजा मजकूर व ग्रामस्थ यांच्या वतीने देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.



# संत रोहिदास जयंती उत्सव २०२५ उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (पंकजकुमार पाटील) :** श्री देव विठ्ठल रखुमाई मंदिर, देवरुख, शाखा मुंबईच्या वतीने "संत रोहिदास जयंती उत्सव २०२५ " दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. शिरोडकर स्मारक मंदिर हॉल, शिरोडकर हायस्कुल, ग्लोबल हॉस्पिटलच्या समोर, डॉ. बोर्जेस मार्ग, परेल (पूर्व), मुंबई याठिकाणी मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांकडून संत रोहिदास महाराजांच्या कार्याची माहिती देण्यात आली. तसेच महिलांसाठी हळदी कुंकू आणि विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या तसेच शैक्षणिक, कला आणि क्रीडा विभागात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमास मुंबई शाखेचे सर्व आजी माजी पदाधिकारी आणि सभासद यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मेहनत घेतली.



# 5 वर्षे 11 महिन्यांच्या मुलाने 400 मीटर धावून केले इंडिया बुक्स आणि एशिया बुक्समध्ये रेकॉर्ड.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

दिनांक 15 फेब्रुवारी रोजी आंतरराष्ट्रीय दिशांत समारंभ ' इंटरनॅशनल कॉन्व्होकेशन इंडिया बुक्स ऑफ रेकॉर्डस' फरीदाबाद, हरियाणा, च्या हॉलमध्ये संपन्न झाला. या समारंभात 'व्योम कल्पेश पटेल', वय 5.11 वर्ष या विद्यार्थ्यास भारतामध्ये फास्टेस्ट कीड टू रन ऑन 400 मीटर अथलेटिक ट्रॅक या पदवीने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर ' एशिया बुक ऑफ रेकॉर्ड ' द्वारे ' ग्रँडमास्टर ' या पदवीने त्याचा गौरव करण्यात आला. प्रमाणपत्र व पदक देऊन त्याचा सन्मान करण्यात आला. त्याचे कोच म्हणून त्याचे वडील कल्पेश शशिकांत पटेल त्याच्याकडून तयारी करून घेत होते. त्याविषयी बोलताना वडील कल्पेश पाटील म्हणाले की त्याला धावण्याची आवड लहानपणापासूनच होती. दररोज संध्याकाळी मुंबई




येथील बीचवर ऍथलेटिक्स ट्रॅकवर तो सराव करत होता. याशिवाय तायक्वांदो, स्केटिंग, स्विमिंग याचीही आवड लहानपणापासून असून त्याचा फायदा यामध्ये झाला. याचे श्रेय त्याची कठोर मेहनत, खेळाविषयी आवड आणि मैदानी शिस्त याला जाते. त्यामुळे तो हे यश प्राप्त करू शकला. व्योम हा चिल्ड्रन्स अकॅडमी स्कूल मध्ये शिकत आहे. या यशामुळे त्याने कुटुंबाचे, शाळेचे पर्यायाने देशाचे नाव उंचावले आहे. त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वाचनालय सुरू

## सोलापूर जिल्हा कार्यकारिणीचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**सोलापूर प्रतिनिधी**

प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ जिल्हा सोलापूर यांच्या वतीने अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवतेजसिंह (शिवबाबा) मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माळेवाडी- अकलूज येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वाचनालय सुरू करण्यात आले आहे. सदर वाचनालयाचे उद्घाटन सौ. देवन्या शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सौ. देवन्या मोहिते-पाटील म्हणाल्या की, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वाचनालय सुरू केलेला हा स्तुत्य उपक्रम असून वयोवृद्धांसाठी विरंगुळ्याचे ठिकाण ठरणार आहे. या वाचनालयमुळे त्यांच्या आनंदात व ज्ञानात भर पडणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी अंधश्रद्धा निर्मुलनचे व्याख्याते व वनस्पती शास्त्र विभागाचे माजी प्रमुख रामलिंग सावळजकर, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ खंडागळे, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत कडबाने, ज्येष्ठ पत्रकार भाग्यवंत नायकुडे, पत्रकार लक्ष्मीकांत कुरूडकर, पत्रकार संजय लोहकरे, सुनील कांबळे, विशाल साठे, सचिन झेंडे, अनुराग खंडागळे, पृथ्वीराज कारंडे, प्रकाश भोसले, लालुभाई शेख, बल्लू देशमुख, विजय सुर्यवंशी, रघुनाथ देशमुख, अण्णासाहेब जगदाळे, दादा थीटे, अशोक कोळी, सुनिल कांबळे, विशाल साठे, पृथ्वीराज कारंडे आदी पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शशिकांत कडबाने तर आभार सोमनाथ खंडागळे यांनी मानले. प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या सोलापूर जिल्हा कार्यकारिणीने उत्कृष्ट उपक्रम राबविल्याबद्दल संघाचे संस्थापक अध्यक्ष डी. टी. आंबेगावे, मंत्रालय व विधिमंडळ प्रमुख पंडित मोहिते- पाटील राज्य महिला अध्यक्षा डॉ. सुधाताई कांबळे, राज्य संघटक अनिल राठोड, राज्य सांस्कृतिक प्रमुख प्रशांत विलणकर, राज्य उपाध्यक्ष पंकज वानखेडे विनायक सोळसे, महेश जाधव, विशाल पवार, राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, राजू जाधव, दशरथ अडसूळ, अशोक इंगवले, साईनाथ जाधव, नवनाथ कापले, शमशुद्दीन शेख, राज्य कोषाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, युवा राज्याध्यक्ष नितीन शिंदे, युवा कार्याध्यक्ष प्रशांत राजगुरू, विदर्भ अध्यक्ष केशव सवळकर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुभाष चिंधे, कार्याध्यक्ष शशिकांत पोरे, संपर्क प्रमुख जय कराडे, मराठवाडा अध्यक्ष लहुकुमार शिंदे, मराठवाडा संघटक बा. पू. गायकर, मराठवाडा महिला अध्यक्षा सुमती व्याहाळकर, कार्याध्यक्ष हुकूमत मुलाणी, संपर्क प्रमुख आनंद भालेराव, कोकण अध्यक्ष जयप्रकाश पवार, संपर्क प्रमुख संतोष वाव्हळ, कोकण संघटक श्रीराम कदम, कोकण उपाध्यक्ष योगेश भामरे, कायदेविषयक सल्लागार अड. अमोल सकट, अड. रत्नाकर पाटील, अड.जितेंद्र



पाटील, अड. परेश जाधव, प्राचार्य डॉ वसंत बिरादार, विठ्ठल शिंदे, महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष व तालुका पदाधिकारी यांनी सोलापूर जिल्हा कार्यकारिणीचे कौतुक केले आहे.

# पीएनपी चषक स्पर्धेत बेलोशी बिग बुल्स संघाची बाजी; मुस्तकीम मुकादम मालिकावीर

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

पीएनपी चषक 2025 मध्ये विजेत्या बेलोशी बिग बुल्स संघाचे कौतुक , बेलोशी बिग बुल्स आणि वरसोली चॅलेजर्स यांच्यात अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यात अखेर बेलोशी बिग बुल्सने बाजी मारली आणि पीएनपी चषक 2025 वर नाव कोरले. शिवाय या विजयामुळे बेलोशी संघाच्या खात्यात तब्बल पाच लाख रुपयांची भर पडली. उपविजेता वरसोली चॅलेंजर्स संघाला तीन लाखांचा पुरस्कार आणि चषक तर दोन लाखांचा तृतीय पुरस्कार नांदगाव निंजास संघाला प्रदान करण्यात आला.

सामनावीर – मंथन डाकी
हॅट्रिकवीर – संकल्प म्हात्रे
सर्वोत्कृष्ट गोलंदाज – स्वराज देवळे
सर्वोत्कृष्ट फलंदाज – हर्षद टावरी
सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक – मंथन डाकी
सर्वाधिक षटकार – सौरभ गव्हाणकर
सर्वाधिक चौकार – शिरू वीक
मालिकावीर – मुस्तकीम मुकादम

स्व. प्रभाकर पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ शेकाप आणि पुरोगामी युवक संघटना पुरस्कृत यू. व्ही. स्पोर्टस् अकेडमीने पीएनपी चषक 2025 क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. 19 ते 23 फेब्रुवारी या कालावधीत कुरुळमधील आझाद मैदानावर ही स्पर्धा झाली. रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, पीएनपीचे नृपाल पाटील, यू. व्ही. स्पोटर्स अकेडमीच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, अॅड. मानसी म्हात्रे, प्रदीप नाईक, द्वारकानाथ नाईक, अॅड. प्रवीण ठाकूर, माजी नगरसेविका संजना कीर आदींच्या उपस्थितीत




विजेत्या बलोशी संघाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी बेलोशी बिग बुल्स संघाचे मालक निनाद रसाळ, आशीष नाखवा, वरसोली चॅलेंजर्स संघाचे मालक सुरेश घरत, नांदगाव निंजास संघाचे मालक सरोज दिवेकर, कर्णधार, खेळाडू, हजारो क्रीडाप्रेमी उपस्थित होते. या स्पर्धेत अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्यांतील 24 संघ सहभागी झाले होते. विजेत्यांवर बक्षिसांची खैरात मालिकावीर मुस्तकीम मुकादम यांना टोयाटो कार देण्यात आली. स्वराज देवळे, हर्षद टावरी यांना दुचाकीचा लाभ झाला. तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना एलईडी टीव्ही बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

# लोक कलाकारांनी लोककलेतील भारतीय संस्कृतीचे जतन करावे जिल्हास्तरीय लोककला महोत्सवा सुजलेगाव येथे उद्घाटन खा.रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -:** नायगाव तालुक्यातील सुजलेगाव येथील शाहीर दिगू तुमवाड आयोजित जिल्हास्तरीय लोककला महोत्सव उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने उद्घाटक म्हणून नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र वसंतराव पाटील चव्हाण साहेब उपस्थित होते.या लोककला महोत्सवामध्ये जिल्ह्यातील अनेक शाहीर नामवंत कलाकार जिल्ह्यातील वेगवेगळे नामवंत शाहीर संच उपस्थित होते.या कार्यक्रमांमध्ये कलाकारांना शुभेच्छा देत असताना खासदार रविंद्र चव्हाण यांनी लोक कलाकारांनी आपल्या कलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे जतन करावे व लोककला जिवंत ठेवावे अशी भावना व्यक्त केली केंद्र शासनाने लोक कलाकाराच्या मानधनांमध्ये घट केल्यामुळे त्या संदर्भात केंद्रीय सांस्कृतिक मंत्री अश्विन वैष्णव यांच्याशी चर्चा करून मानधनात वाढ करण्याचा प्रयत्न करेन अशा भावना व्यक्त केल्या यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माधवराव पाटील शेळगावकर, प्रमुख पाहुणे म्हणून शिवराज



पाटील होटाळकर, रुपेश देशमुख कुंटूरकर हनुमंतराव पाटील चेअरमन, सुधाकर बकवाड ,दत्तात्रय आईलवार, दिगंबर पाटील जाधव, भा.ग.म मोरे सर, चंद्रकांत आईवर ,शाहीर बळीराम जाधव, नारायण पाटील शिंदे, गंगाधर नवारे ,गंगाधर देवारे माजी सरपंच, शाहीर बेंद्रे पाटील, संजय पाटील चाळकर, नारायण पाटील तोडे ,अरळक पाटील बकवाड, मारुती कदम देशमुख माजी सरपंच, दिलीप तोडे ,भास्कर पाटील कदम ,संभाजी सज्जन, राजू पाटील ,गणेश कोकाटे यादवराव वडजे, दत्ता पांचाळ ,माधव पवार ,राजू बकवाड, नागराव पाटील,लिंगराव पाटील सर, उमाटे सरपंच, बाबुराव सावळीकर, यासह अनेक शाहीर मंडळी माता भगिनी उपस्थित होते.



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इंदापूर तहसील कार्यालय येथे ठिय्या आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तहसील कार्यालय येथे मंगळवार दि 25 फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँगेस शरद पवार गटाचे सामाजिक न्याय जिल्हाअध्यक्ष सागर मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली दुपारी जवळपास दोन तास ठिय्या आंदोलन करण्यात आले.यावेळी जवळपास 50 निराधार वृद्ध,दिव्यांग,उपस्थित होते मागील दोन महिन्याचे संजय गांधी निराधार योजनेचे गेल्या दोन महिन्यापासून निराधार लोकांना अनुदान मिळाले नाही त्यासाठी ते अनुदान लवकरात लवकर वृद्ध व्यक्तींना त्याचा लाभ देण्यात यावा म्हणून हे आंदोलन करण्यात आले आंदोलनानंतर जिल्हा अध्यक्ष सागर मिसाळ यांनी संजय गांधी निराधार योजनेचे प्रमुख व नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे यांना निवेदन देऊन अनुदान लवकर निराधार लोकांच्या खात्यात जमा करण्यात यावे म्हणून विनंती केली.

## मरळगोई येथील राहत्या घरातून विवाहिता बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका:- प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

– मरळगोई येथील वीस वर्षीय विवाहिता घरातून निघून गेली असून याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात बेपत्ता फिर्याद दाखल झाली आहे.



याबाबत राजेंद्र दगु बर्डे, मरळगोई यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांची सून मोहिनी अशोक पवार वय २० रा.मरळगोई खु.ही शरीराने मजबुत, रंग सावळा, उंची पाच फुट, चेहरा उभट, नाक थोडे बसके, डोळे साधारण काळे, डोक्याचे केस मध्यम लांबीचे, अंगात पोपटी रंगाचा पंजाबी टॉप व काळया रंगाची लेगिन, कानात सोन्याचे झुमके, गळयात काळया मन्याची पोत असलेले मणी मंगळसुत्र, पायात फिक्कट लाल रंगाची साधी चप्पल असे वर्णन आहे. ती दि.१९ फेब्रु. २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता कोणास काही एक न सांगता घरातुन निघुन गेली आहे. तिचा गावात, लासलगाव, विंचुर, निफाड परिसरात व नातेवाईक यांचेकडेस शोध घेतला परंतु ती मिळुन न आल्याने बेपत्ता फिर्याद आहे. ती कुणाला आढळल्यास लासलगाव पोलीस ठाणे अथवा पो.नाईक किशोर लासुरकर यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## जीवनाचा खरा सुगंध आणि संपत्ती

**- आसाराम विरकर - दैनिक युवक आधार**

जीवन हे अनमोल आहे आणि प्रत्येक क्षण आनंदाने जगणे गरजेचे आहे. जसे सुगंध देणारी अगरबत्ती जळून संपल्यावर फक्त राख उरते, तसेच माणसाचेही आयुष्य आहे. जोपर्यंत शरीरात जीव आहे, तोपर्यंत जगण्याचा प्रत्येक क्षण सुंदर बनवण्याचा प्रयत्न करावा, कारण एकदा का जीवन संपले की मागे फक्त आठवणीच उरतात. पैसा हा जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे, पण पैसा म्हणजेच सुख नव्हे. जगण्यासाठी जितका पैसा लागतो, तितकाच मिळवावा, कारण पैसा असला तरी भुकेपेक्षा जास्त अन्न कोणीच खाऊ शकत नाही. तसेच, पैसा कितीही मिळवला तरी समाधान आणि मनःशांती मिळेलच असे नाही. त्यामुळे जीवनात पैशाला मर्यादित महत्त्व द्यावे आणि त्याच्या मागे आंधळेपणाने धावू नये. खऱ्या संपत्तीचे मोजमाप बँकेतील पैशाने नव्हे, तर मिळवलेल्या माणसांनी ठरते. एकाकी श्रीमंतीपेक्षा माणुसकीने श्रीमंत असलेले जीवन अधिक सुंदर असते. प्रेम, आपुलकी आणि विश्वासाने नाती जपणाऱ्या व्यक्तींचे अस्तित्व कायम राहते. म्हणूनच, आयुष्य सुंदर बनवण्यासाठी इतरांसाठी प्रकाशाचा दीप व्हा. भौतिक सुखाच्या मागे न धावता समाधान शोधा. लोकांमध्ये प्रेम आणि आपुलकीचे नाते जोपासा. शेवटी, मागे उरतो तो आपल्या कृतींचा सुगंध आणि लोकांच्या मनात निर्माण झालेली आपली आठवण.

## बत्तीस वर्षीय तरुणाची आत्महत्या

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कानपोली येथील 32 वर्षीय विनायक विष्णू पोरजी या तरुणाने नारपोली येथील शेतातील करंजाच्या झाडास साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना 20 फेब्रुवारी रोजी रात्री घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. 20 फेब्रुवारी रोजी विनायक पोरजी याने पुणे येथे जाणार असल्याचे सांगून दारूच्या नशेमध्ये शेतातील करंजाच्या झाडात साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## मराठी भाषा गौरव दिन निमित्त 'कुटुंब रंगलय काव्यात' चे आयोजन

### पर्यावरणपूरक गणेश उत्सव स्पर्धा पारितोषिकाचे वितरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

मराठी भाषा गौरव दिन आणि कुसुमाग्रज जयंती निमित्त दिनांक 27 फेब्रुवारी रोजी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'कुटुंब रंगलय काव्यात प्रा. विसूभाऊ बापट यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच पर्यावरणपूरक गणपती उत्सव स्पर्धेतील विजेत्या मंडळांना पारितोषिकाचे वितरणही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी आमदार प्रशांत ठाकूर तसेच आमदार विक्रांत पाटील, मनपा आयुक्त मंगेश चितळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. हा कार्यक्रम आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात दिनांक 27 फेब्रुवारी रोजी सकाळी 11.00 वाजता सुरू होणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# मुख्यमंत्र्यांनी पहिल्याच दिवशी दम दिलाय, आमच्या हातात काही नाही

### माणिकराव कोकाटेंच्या विधानावरून महायुतीत कलह?

**पुणे** : निवडून आल्यानंतर पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दम दिला की, आता तुमच्या कोणाच्या जाण्यामुळे सरकारवर काहीही परिणाम होणार नाही. त्यामुळे जास्त मस्ती कराल तर घरी जाल, विभागाचे काम शिस्तीत झाले पाहिजे. आमचे खासगी सचिव आणि विशेष कार्य अधिकारीसुद्धा मुख्यमंत्री ठरवतात. आमच्या पण हातात काही राहिले नाही. त्यामुळे तर आम्हाला आता नीट काम करावेच लागेल, असे विधान राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केल्याने नजीकच्या भविष्यात महायुतीमध्ये मोठा कलह माजण्याची शक्यता आहे.

पीक विमा योजनेतील भ्रष्टाचाराबाबत केलेले धक्कादायक विधान आणि सदनिकेवरून न्यायालयाने दोषी ठरविल्याने गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेले माणिकराव कोकाटे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दलच महत्त्वाचे वक्तव्य केल्याने खळबळ माजली आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे पुणे येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या राज्यस्तरीय पणन परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी महायुती सरकारच्या कामाच्या पद्धतीबाबत भाष्य केले. आता आमच्या हातात काहीही राहिलेले नाही, खासगी सचिव आणि विशेष कार्य अधिकारी हे मुख्यमंत्री ठरवतात, असे विधान कोकाटे यांनी केले आहे. त्यामुळे आता आम्हाला चांगले काम करावे लागेल, असेही कोकाटे यांनी म्हटले आहे.

### हरकत काय

कोकाटे यांच्या या विधानानंतर भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी प्रतिक्रिया दिली. हे सर्व विधान सकारात्मकपणे घ्यायला पाहिजे. चांगल्या कामासाठी काही शिस्त लावली जात असेल तर त्याचे स्वागत केले पाहिजे. कोकाटे यांच्या वक्तव्याचा मतितार्थ मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत नकारात्मक नव्हता. सकारात्मकतेच्या बाजूने आपल्याला जावे लागणार आहे असा त्याचा अर्थ आहे. मुख्यमंत्र्यांनी खासगी सचिव ठरवले तर काय हरकत आहे. लोकांना कामाशी मतलब आहे. जर चांगली यंत्रणा तिथे असेल तेच महाराष्ट्रातील जनतेला हवे आहे. ही जनता खूश होऊन सगळ्यांनाच आशीर्वाद देईल, असे दरेकर यांनी म्हटले आहे.

# चेहरा फडणवीसांचा, पण नेतृत्व शिंदे यांचे

**मुंबई** : देवेंद्र फडणवीस यांचा चेहरा पाहून लोकांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मते दिली, या भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केलेल्या विधानाने महायुतीत कुरबूर सुरू झाली. धस यांच्या विधानाला शिवसेनेचे नेते आणि कॅबिनेटमंत्री शंभूराज देसाई यांनी उपरोधिक शैलीत उत्तर दिले. "एकनाथ शिंदे कधीही म्हणाले नाहीत की, माझ्या एकट्यामुळे हे झाले, चेहरा फडणवीसांचा होता, परंतु नेतृत्व शिंदे यांचे होते," असे देसाईंनी धस यांना सुनावले.

शंभूराज देसाई म्हणाले, "सुरेश धस यांचे हे मत असले, तरी महायुती म्हणून आम्ही निवडणुकीला सामोरे गेलो. निवडणुकीला महायुती म्हणून सामोरे जात असताना सर्व नेत्यांनी सांगितले होते की, त्यावेळचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुती निवडणुकीला सामोरे जात आहे. त्यावेळी एकनाथ शिंदेंचा चेहरा घेऊन निवडणुकीला सामोरे गेलो."

### शंभुराजे देसाई यांनी धस यांना सुनावले

#### लाडकी बहीण योजना

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेबद्दल आज जरी तुम्ही महिलांना विचारले तर महिला सांगतात की, केवळ एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते म्हणून आम्हाला ही योजना मिळाली. त्यामुळे शेवटी ही सामूहिक जबाबदारी आहे, असे शंभूराज देसाई म्हणाले.

#### असे शिंदे कधी म्हणाले

एकनाथ शिंदे हे नेहमी म्हणायचे की, मी आणि माझ्यासोबतचे दोन्ही मुख्यमंत्री मिळून आम्ही हे सरकार चालवत आहोत. शिंदे कधीच असे म्हणाले नाहीत की, मी एकट्याने निवडणुका लढवल्या, माझ्या एकट्यामुळे हे झाले. एकनाथ शिंदे आजही म्हणतात, आम्ही तिघांनीही प्रयत्न केले म्हणून हे यश मिळाले. महायुतीचे यश हे तिन्ही पक्षांचे आहे. त्यावेळी नेतृत्व एकनाथ शिंदे यांचे होते, असे म्हणत देसाईंनी धस यांना सुनावले.

# बोगद्यात अडकलेल्या मजुरांना सोडवण्यासाठी बचावकार्य सुरूच



### नौदलाचे मार्कोस कमांडो दाखल

**हैदराबाद** : तेलंगणाच्या नागरकुर्नूल जिल्ह्यात श्रीशैलम कालवाच्या बोगद्याचा एक भाग २२ फेब्रुवारीला कोसळला. यात ८ कामगार अडकले आहेत. या मजुरांच्या सुटकेसाठी तीन दिवस लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ यांच्यासोबतच नौदलाचे मार्कोस कमांडो सहभागी झाले आहेत.

२०२३ मध्ये सिलक्यारा बोगद्यात अडकलेल्या कामगारांची सुटका केलेल्या पथकालाही या बचावकार्यात सहभागी करून घेतले आहे. या पथकाने १७ दिवसांनंतर ४१ जणांना सुरक्षितपणे बाहेर काढले होते.

तेलंगणा सरकारचे मंत्री जुपल्ली कृष्ण राव म्हणाले की, बोगद्याच्या मुखापासून १३ किमी आत ही घटना घडली आहे. बचाव पथक अडकलेल्या कामगारांपासून १०० मीटर दूर आहे. तेथे पाणी व चिखलामुळे मोहिमेत अडथळे येत आहेत. कामगारांची वाचण्याची शक्यता कमी आहे. मात्र, आमचे प्रयत्न सुरू आहेत. या बोगद्यात एंडोस्कोपिक व रोबोटिक कॅमेरे लावले आहेत. तसेच एनडीआरएफच्या श्वान पथकाची मदत घेतली जात आहे.

एल अ‍ॅण्ड टीच्या एंडोस्कोपिक दोवदीप याने सांगितले की, एंडोस्कोपिक कॅमेऱ्याच्या सहाय्याने आम्ही बोगद्यात काय चालले आहे हे पाहू शकतो. उत्तराखंड बचाव कार्यातही आम्ही हेच केले होते.

या बचावासाठी एनडीआरएफचे १४५ व एसडीआरएफचे १२० जवान तैनात आहेत.

# सेन्सेक्स ७५ हजारांखाली

### निर्देशांक ८५७ अंकांनी कोसळला

■ कमकुवत जागतिक संकेत ■ विदेशी संस्थांच्या विक्रीचा परिणाम

**मुंबई** : सोमवारी सलग पाचव्या सत्रात घसरण होऊन सेन्सेक्स ८५७ अंकांनी कोसळून ७५ हजारांखाली गेला. वाढत्या व्यापार तणावादरम्यान, जागतिक बाजारातील कमकुवत कल आणि सतत विदेशी संस्थांकडून निधी काढून घेण्यात येत असल्याचा हा परिणाम आहे. याशिवाय, आयटी, दूरसंचार आणि धातू समभागांच्या विक्रीमुळे बाजारात नकारात्मक वातावरण राहिले, असे विश्लेषकांनी सांगितले. दरम्यान, भारतीय चलन बाजारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया चार पैशांनी कमजोर होऊन ८६.७२ झाला.

बीएसई निर्देशांक ८५६.६५ अंक किंवा १.१४ टक्क्यांनी घसरून ७४,४५४.४१ वर बंद झाला. दिवसभरात तो ९२३.६२ अंकांनी किंवा १.२२ टक्क्यांनी घसरून ७४,३८७.४४ वर आला होता. अशाच प्रकारे एनएसई निफ्टी २४२.५५ अंकांनी किंवा १.०६ टक्क्यांनी घसरून २२,५५३.३५ वर आला बीएसईवर तब्बल २,८१० समभाग घसरले, तर १,२०७ वधारले आणि १८३ समभागांमध्ये बदल झाला नाही.

निर्यात करणाऱ्या राष्ट्रांवर अमेरिकेकडून उच्च शुल्क आकारणी करण्याच्या संभाव्य हालचालींबद्दल बाजार अधिक चिंतीत आहे, ज्याचा भारतासह विकसनशील देशांवर परिणाम होऊ शकतो. तसेच, एफआयआयकडून विक्रीचा मारा सुरूच असून निधी काढणे थांबण्याची कोणतीही चिन्हे दर्शवत नाहीत.


मेहता इक्विटीज लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष (संशोधन) प्रशांत तपासे म्हणाले, बँकिंग, आयटी, दूरसंचार आणि इतर जुन्या वित्तीय क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांच्या मोठ्या प्रमाणातील विक्रीमुळे सेन्सेक्स ७५ हजारांखाली गेला आहे.

बीएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये बीएसई फोकस्ड आयटी २.६५ टक्के, आयटी २.६० टक्के, टेक २.५६ टक्के, दूरसंचार २.२६ टक्के, धातू २.१६ टक्के, कमोडिटीज १.५३ टक्के आणि युटिलिटीज १.४२ टक्के) घसरले. दुसरीकडे, ऑटो आणि एफएमसीजी वाढले.

बीएसई स्मॉलकॅप १.३१ टक्क्यांनी घसरला आणि मिडकॅप निर्देशांक ०.७८ टक्क्यांनी घसरला.

विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (FIIs) शुक्रवारी ३,४४९.१५ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री केली, असे एक्स्चेंजची आकडेवारी सांगते.

विदेशी गुंतवणूकदारांनी या महिन्यात आतापर्यंत शेअर बाजारामधून २३,७१० कोटी रुपयांहून अधिक पैसे काढले आहेत. जागतिक व्यापार तणाव वाढताना २०२५ मध्ये एकूण १ लाख कोटी रुपये काढून घेण्यात आले.



#### पाच सत्रांत १,५४२ अंकांची लोळण

गेल्या पाच व्यवहार सत्रांमध्ये, बीएसई निर्देशांक १,५४२.४५ अंक किंवा २ टक्क्यांनी कमी झाला आणि निफ्टी ४०६.१५ अंक किंवा १.७६ टक्क्यांनी घसरला. सेन्सेक्स वर्गवारीत एचसीएल टेक, झोमॅटो, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, इन्फोसिस, टेक महिंद्रा, भारती एअरटेल, टाटा स्टील आणि एनटीपीसी हे सर्वात जास्त घसरले. याउलट महिंद्रा अँड महिंद्रा, कोटक महिंद्रा बँक, मारुती, नेस्ले आणि आयटीसी हे शेअर वधारले.

#### गुंतवणूकदारांचे ४.२२ लाख कोटींचे नुकसान

सोमवारी बीएसई सेन्सेक्स १ टक्क्यांहून अधिक घसरत ७५ हजारांखाली गेल्याने गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ४.२२ लाख कोटी रुपयांची घट झाली. बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल सोमवारी एकाच सत्रात रु. ४,२२,९८३.०८ कोटींनी घसरून रु. ३,९७,९७,३०५.४७ कोटी (४.५९ ट्रिलियन डॉलर) झाले.

# भारतीय आयटी क्षेत्राचा महसूल ५.१ टक्के वाढणार

■ आर्थिक वर्ष २५ मध्ये २८२.६ अब्ज डॉलर
■ नॅसकॉमचा अंदाज

**मुंबई** : आयटी उद्योग संस्था नॅसकॉमने सोमवारी या क्षेत्राचा आर्थिक वर्ष २५ मध्ये महसूल ५.१ टक्क्यांनी वाढून ६२.८२ अब्ज डॉलर होईल, असा अंदाज व्यक्त केला. तसेच आर्थिक वर्ष २६ मध्ये हा उद्योग ३०० अब्ज डॉलर महसूल ओलांडण्याची शक्यता आहे, जे आर्थिक वर्ष २५ च्या पातळीपेक्षा सुमारे ६ टक्क्यांनी जास्त आहे, असे नॅसकॉमचे अध्यक्ष राजेश नांबियार यांनी नॅसकॉम टेक्नॉलॉजी लीडरशिप फोरममध्ये सांगितले.

आमच्या आजूबाजूला घडत असलेल्या सर्व गोष्टी पाहता हा एक चांगला परिणाम आहे, असे सांगून नांबियार यांनी आर्थिक वर्ष २५ मधील व्यवसाय परिणामांवर भाष्य करताना पत्रकारांना सांगितले. तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत लोकांची संख्या वर्षभरात १.२६ लाखांनी वाढून ५८ लाख झाली आहे, असे नॅसकॉमच्या अंदाजात म्हटले आहे.

पारंपरिक आयटी सेवा कंपन्यांचा आर्थिक वर्ष २५ मध्ये महसूल ४.३ टक्क्यांनी वाढून १३७.१ अब्ज डॉलर होईल, तर व्यवसाय प्रक्रिया आऊटसोर्सिंग महसूल ४.७ टक्क्यांनी वाढून ५४.६ अब्ज डॉलर होईल.

अभियांत्रिकी संशोधन आणि विकास कंपन्यांच्या महसुलात वाढ सर्वात वेगवान ७ टक्क्यांनी होऊन तो ५५.६ अब्ज डॉलर होईल. कंपन्यांचा देशांतर्गत महसूल ७ टक्के वाढून ५८.२ अब्ज डॉलर होईल, निर्यात महसुलातील ४.६ टक्क्यांच्या वाढीपेक्षा जलद वाढ होऊन २२४.४ अब्ज डॉलर येण्याची शक्यता आहे.

महसूल विभाजनाच्या दृष्टिकोनातून, निर्यात महसूल जागतिक बहुराष्ट्रीय कंपन्या आणि भारत-आधारित कंपन्यांमध्ये समान रीतीने विभागला जातो, असे नांबियार म्हणाले.

# चौथ्या तिमाहीत कंपन्यांच्या महसुलात ७-८ टक्के वाढ : इक्रा

### ग्रामीण मागणी पुन्हा वाढणार, सरकारी खर्च होण्याचा लाभ

**नवी दिल्ली** : देशांतर्गत रेटिंग एजन्सी इक्राने सोमवारी सांगितले की भारतीय कंपन्या चालू आर्थिक वर्षाच्या मार्च तिमाहीत (चौथ्या तिमाहीत) ७-८ टक्के महसुलात वाढ होण्याची शक्यता आहे. कारण सरकारी खर्चात वाढ आणि मागणीत वाढणार आहे.

भू-राजकीय घडामोडींच्या अनिश्चितता आणि भारतातून होणाऱ्या व्यापारी मालाच्या निर्यातीवरील तुलनेने कमी झालेला दृष्टिकोन लक्षात घेऊन खासगी भांडवली खर्च मोजला जावा, अशी 'इक्रा'ची अपेक्षा आहे. असे असले तरी, काही उदयोन्मुख क्षेत्र जसे की, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर आणि ऑटोमोटिव्ह स्पेसमधील विशिष्ट विभाग जसे की इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही) भारत सरकारने जाहीर केलेल्या उत्पादनाशी संबंधित विविध प्रोत्साहन कार्यक्रमांच्या (पीएलआय) अनुषंगाने गुंतवणुकीत वाढ होत राहतील, असे त्यात म्हटले आहे.

एका निवेदनात, इक्राने म्हटले आहे की, गेल्या तिमाहीत भारत कंपन्यांसाठी ऑपरेटिंग प्रॉफिट मार्जिन (OPM) मधील पुनर्प्राप्ती १८.२ -१८.४ टक्क्यांवर टिकून राहण्याची शक्यता आहे, जी मागणी वाढल्याने, सुधारित ग्राहक भावनांमुळे समर्थित आहे. बहुतेक खरीप पिकांचे भरघोस उत्पादन आणि चालू रब्बी हंगामासाठी अनुकूल परिस्थिती यामुळे, कॅलेंडर वर्ष २०२५ च्या पहिल्या सहामाही (जानेवारी-मार्च) मध्ये ग्रामीण मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. याशिवाय, २०२५ मध्ये एक सामान्य आणि चांगल्या मान्सूनमुळे कृषी उत्पादन उत्तम होण्याची अपेक्षा आहे, असे किंजल शाह, कृषी विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि सह-उपाध्यक्ष प्रमुख, कॉर्पोरेट रेटिंग, इक्रा म्हणाले.

गेल्या काही तिमाहीत मंदावलेली शहरी मागणी सुधारण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणात आयकर सवलत, भारतीय रिझर्व्ह बँकेने व्याजदरात केलेल्या कपातीमुळे कर्ज स्वस्त होऊन आर्थिक सुलभता आणि अन्नधान्य महागाई कमी होण्याची अपेक्षा यामुळे मागणी वाढेल, असे शाह पुढे म्हणाले.

इक्राने म्हटले आहे की, जागतिक आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत बदल, परकीय चलन बाजारात भारतीय चलनाचे घसरणारे दर, अमेरिकेच्या नवीन अध्यक्षांच्या धोरणांचा प्रभाव, सरकारी खर्चात वाढ आणि देशांतर्गत शहरी मागणीचे पुनरुज्जीवन हे नजीकच्या काळात प्रमुख निरीक्षणे राहतील.

इक्राच्या आर्थिक वर्ष २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीचे विश्लेषण (ऑक्टोबर-डिसेंबर) ६०२ सूचीबद्ध कंपन्यांची कामगिरी (वित्तीय क्षेत्रातील संस्था वगळून) ६.८ टक्के वार्षिक महसूल वाढ दर्शविते.

# रेपो रेट, आयकर कपातीचा मध्यमवर्गीयांना दिलासा

■ भोपाळमध्ये 'ग्लोबल इन्व्हेस्टर्स समिट २०२५'चे उद्घाटन ■ नियमनमुक्तीवर राज्यांशी सतत चर्चा

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली** : भारतीय रिझर्व्ह बँकेने व्याजदरात कपात करणे आणि २०२५-२६ (एप्रिल-मार्च) च्या अर्थसंकल्पात आयकर दर कमी करण्याच्या सरकारच्या प्रस्तावाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी कौतुक केले. हे दोन्ही निर्णय भारताच्या मध्यमवर्गाला सशक्त करतील, असे ठामपणे सांगत हा वर्ग देशातील सर्वात मोठा करदाता असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

या महिन्याच्या सुरुवातीला आरबीआयच्या पतधोरण समितीने एकमताने पॉलिसी रेपो दर २५ आधार अंकांनी कमी करून ६.२५ टक्क्यांवर आणण्याचा निर्णय घेतला. ही जवळपास पाच वर्षांतील पहिली कपात आहे. सरकारने, आर्थिक वर्ष २६ च्या अर्थसंकल्पात १.२ दशलक्ष रुपयांपर्यंतचे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त करण्याचा प्रस्ताव मांडला.

भोपाळ येथील ग्लोबल इन्व्हेस्टर्स समिटमध्ये बोलताना मोदींनी जागतिक बँकेच्या भाकितांचा संदर्भ दिला की, येत्या काही वर्षांत भारत जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील. सामान्य लोक, आर्थिक धोरण तज्ज्ञ, विविध देश किंवा संस्था अशा प्रत्येकाच्या भारताकडून अपेक्षा आहेत. गेल्या काही आठवड्यांत आलेल्या टिप्पण्यांमुळे भारतातील प्रत्येक गुंतवणूकदाराचा उत्साह वाढेल, असे मोदी म्हणाले. काही दिवसांपूर्वीच जागतिक बँकेने सांगितले की, येत्या काही वर्षांत भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था राहील. ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंटचे प्रतिनिधी म्हणाले की, जगाचे भविष्य भारतात आहे, असे मोदी म्हणाले.

नियमनमुक्तीबाबत केंद्र सरकार राज्य सरकारांशी सतत चर्चा करत असल्याचे मोदींनी सांगितले. तत्पूर्वी, २०२४-२५ (एप्रिल-मार्च) साठीच्या आर्थिक सर्वेक्षणात असे म्हटले होते की, भारताला त्याच्या मध्यम-मुदतीच्या वाढीच्या संभाव्यतेला बळकट करण्यासाठी तळागाळातील संरचनात्मक सुधारणा आणि नियंत्रणमुक्तीद्वारे जागतिक स्पर्धात्मकता सुधारण्याची आवश्यकता आहे.

आर्थिक वर्ष २५ च्या आर्थिक सर्वेक्षणाने एप्रिलपासून सुरू होणाऱ्या पुढील आर्थिक वर्षासाठी जीडीपी ६.३ टक्के ते ६.८ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. २०४७ साठी 'विकसित भारत' दृष्टिकोन साध्य करण्यासाठी भारताने अंदाजे १०-२० वर्षांसाठी सरासरी ८ टक्क्यांच्या वास्तविक जीडीपी वाढीचा दर गाठला पाहिजे, असेही त्यात म्हटले आहे. गेल्या दशकात ऊर्जा क्षेत्रात अभूतपूर्व वाढ झाल्याचे मोदींनी अधोरेखित केले. हरित ऊर्जा क्षेत्रात भारताने जे साध्य केले आहे ते कल्पनाही करणे कठीण होते, असे ते म्हणाले. १० वर्षांत, अक्षय ऊर्जा क्षेत्रात सुमारे ७० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्यात आली आहे, असे मोदी म्हणाले.

गेल्या दशकात देशाने पायाभूत सुविधांमध्ये भरभराट पाहिली आहे आणि मध्य प्रदेशला याचा मोठा फायदा झाला आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. देशातील दोन मोठ्या शहरांना जोडणाऱ्या दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाचा मोठा भाग मध्य प्रदेशातून जातो, असे ते म्हणाले.



#### एनटीपीसी, रिलायन्स, अदानी चार लाख कोटी गुंतवणार

उद्योगपती गौतम अदानी यांचा समूह, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि सरकारी मालकीची ऊर्जा उत्पादक कंपनी एनटीपीसी या डझनभर कंपन्यांनी सोमवारी मध्य प्रदेशातील उद्योगांमध्ये सुमारे ४ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले होते.

# पनवेलमध्ये "संदीप वैभव...आणि कविता'

### मराठी राजभाषा गौरव दिन व कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

मराठी राजभाषा गौरव दिन व कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड सांस्कृतिक सेलच्या वतीने लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७. ३० वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'संदीप वैभव... आणि कविता' हि वैभव जोशी आणि संदीप खरे यांच्या स्वरचित कवितांची नित्य नवी मैफिल आयोजित करण्यात आली आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, आणि मराठी भाषेला राज्याच्या अधिकृत भाषेचा दर्जा मिळाला. त्यामुळे, १ मे हा 'मराठी राजभाषा दिन' किंवा 'मराठी भाषा दिन' म्हणून ओळखला जातो.तसेच, २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज,यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या गौरवासाठी समर्पित आहे. १ मे हा मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाल्याचा दिवस, तर २७ फेब्रुवारी हा मराठी भाषेच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक योगदानाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. ज्याद्वारे मराठी भाषेचे संवर्धन आणि प्रसार केला जातो. "संदीप वैभव...आणि कविता' हा एक लोकप्रिय मराठी काव्य कार्यक्रम आहे, ज्यामध्ये प्रसिद्ध कवी संदीप खरे आणि वैभव जोशी आपल्या कवितांचे सादरीकरण करून विविध कवितांद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतात. त्यामुळे या कार्यक्रमाचे अनन्य साधारण महत्व असून रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी वैभव बुवा ९०२९४१०६९९ किंवा अभिषेक पटवर्धन ८६६८३३२१५९ या क्रमांकावर संपर्क करावा.

# .. नळदुर्ग येथील शिव बसव राणा सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी व उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड..

**दैनिक युवक आधार**
**संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

नळदुर्ग शहरात प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज महात्मा बसवेश्वर महाराज विर महाराणा प्रतापसिंह महाराज यांची सालाबाद प्रमाणे याही वर्षी सार्वजनिक एकत्र जयंती साजरी करण्यात येणार असून दि.१६ मार्च रोजी स्थापना करून दि १७ मार्चला राज्यस्तरीय डान्स स्पर्धा दि १८ मार्चला लातूर येथील शिवशाहीर संतोष साळुंखे पोवाडा कार्यक्रम सादर होणार आहे व दि. २० मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता भव्य दिव्य मिरवणूक असा कार्यक्रम असणार आहे या जन्मोत्सव निमित्तान कार्यकारणी गठन करण्यात आले असून अध्यक्षपदी संतोष पुदाले यांची एक मताने निवड करण्यात आली आहे तर उपाध्यक्षपदी प्रमोद कुलकर्णी / वैभव पाटील तसेच कोषाध्यक्ष पदी शिवय्या स्वामी व नवल जाधव सचिव शिवाजी गायकवाड सहसचिव राहुल जाधव सांस्कृतिक प्रमुख म्हणून नेताजी महाबोले अमित शेंडगे प्रविण चव्हाण यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे यावेळी माजी नगरसेवक नितीन कासार शरद बागल अमृत पुदाले सुधीर (भैया) हजारे



विनायक अहंकारी सरदार सिंग ठाकूर विलास येडगे दिपक काशीद सर या सर्व मान्यवरचे उपस्थितीमध्ये बैठक पार पडली तसेच या बैठकीसाठी

शिव बसव राणा सार्वजनिक जयंतीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते